# सहशालेय उपक्रम राबविताना येणाऱ्या अडचणींचा आणि उपाययोजनांचा चिकित्सक अभ्यास

संशोधकाचे नाव
श्रीम. मीना बाळू पवार
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविदयालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
*अभ्यासकेंद्र येवला 54499*

मार्गदर्शकाचे नाव
डॉ. रश्मी जोशी
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविदयालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
*अभ्यासकेंद्र येवला 54499*

***सारांश-:***

***प्रत्येक व्यक्तीचा सर्वांगीण विकास हा शिक्षणावर अवलंबून असतो. तो जितके ज्ञान अवगत करेन तितका तो उंच शिखर गाठतो. शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा पाया शाळेतच रचला जातो. तुमच्या मध्ये जे काही उत्तम गुण आहे ते प्रकट करणे म्हणजे शिक्षण होय. शाळेत मिळालेल्या शिक्षणाच्या आणि संस्कार मूल्यांच्या आधारावरच पुढील यश अवलंबून असते. शिक्षण ही एक अशी प्रक्रिया आहे,जी विद्यार्थ्यांना ज्ञान कौशल्य, मूल्ये आणि दृष्टिकोन आत्मसात करण्याची संधी देते. शिक्षण ही कोणत्याही समस्या असो त्या समस्या सोडवण्याची क्षमता प्रदान करते.शालेय शिक्षणात विद्यार्थी, शिक्षक, पालक व शाळा असे प्रमुख चार घटक असतात. तर समाज हा त्यांचा परिसर असतो.उत्तम दर्जाचे आणि सर्वांसाठी शिक्षण हे आपले प्राथमिक ध्येय असायला हवे. प्राथमिक ,माध्यमिक, उच्च माध्यमिक तसेच जीवनात उपयोगी असे कौशल्य विकसित करणारे शिक्षण दिले पाहिजे. कारण यशस्वी जीवन हे शिक्षणावरच अवलंबून आहे. स्वामी विवेकानंद म्हणतात की, प्रत्येक व्यक्तीमध्ये जे दडलेले आहे ते बाहेर काढणे म्हणजे शिक्षण. थोडक्यातविद्यार्थ्यांचासर्वांगीण विकास म्हणजे त्याचाबोधात्मक,कार्यात्मक व भावात्मक विकास होय.यासाठी शाळेत अभ्यासक्रमाबरोबरच विविध अभ्यास पूरक उपक्रम देखील घेतले जातात.विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देऊन त्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो पण हे उपक्रम राबवत असताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते .याचा अभ्यास संशोधक आपल्या संशोधनात करणार आहे व त्यावर कोणत्या उपाययोजना करता येतील याचा शोध संशोधक घेणार आहे***

*Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's* licensed Based on a work at http://www.goeiirj.com

**महत्त्वाचे शब्द**-:
1) शिक्षण
2) प्राथमिक शिक्षण
3) सहशालेय उपक्रम

**शिक्षण-:**

अनेक विचारवंतांनी संशोधकांनी शिक्षणाची वेगवेगळी व्याख्या सांगितली आहे .पण या सर्वात स्वामी विवेकानंद म्हणतात की, प्रत्येक व्यक्तीमध्ये जे दडलेलं आहे, जे सूक्त गुण आहे ते बाहेर काढणे म्हणजेच शिक्षण. शिक्षण हे विद्यार्थ्यांना ज्ञान आणि जीवन कौशल्य प्रदान करण्याची प्रक्रिया आहे. हे ज्ञान विद्यार्थी औपचारिक, अनौपचारिक अशा मार्गाने मिळवते. असे म्हणतात, शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि ते ते घेतल्यावर माणूस गुरगुरल्याशिवाय राहणार नाही, तसेच शिक्षण ही यशाची गुरुकिल्ली आहे . शिक्षणाने व्यक्तीचा सर्वांगीण विकास होत असतो.

**प्राथमिक शिक्षण-:**

महाराष्ट्र राज्यात प्राथमिक शिक्षण हे RTE या कायद्याअंतर्गत 6ते14 वयोगटातील मुलांना प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे दिले जाते .प्राथमिक शिक्षण हा औपचारिक शिक्षणाचा पाया आहे. इयत्ता पहिली ते पाचवी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण व सहावी ते आठवी पर्यंतचे उच्च प्राथमिक शिक्षण म्हणून ओळखले जाते. प्राचीन काळी प्राथमिक शिक्षण हे शिक्षक केंद्रित होते. त्यामध्ये बदल होऊन आता ते विद्यार्थी केंद्र झाले आहे.प्राथमिक शिक्षणाची विद्यार्थ्यांना गोडी लागावी म्हणून शासनामार्फत विविध योजना व उपक्रम राबविले जातात .त्यातील सहशालेयउपक्रम हा विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो.

**सहशालेय उपक्रमांची ऐतिहासिक पार्श्वभूमी व सद्यस्थिती-:**

**सहशालेयउपक्रमांचा इतिहास:---**

आधुनिक अभ्यासक्रमाच्या अभ्यासक्रमात सह-अभ्यासक्रम उपक्रम नवीन नाहीत. ते भारतीय प्राचीन शाळा, गुरुकुल आणि धार्मिक स्थळांमध्ये आढळतात. महाभारत, रामायण, वेद, उपनिषद इत्यादी सर्व भारतीय धर्मग्रंथांमध्ये अभ्यासक्रमेतर उपक्रमांचा उल्लेख आहे. प्राचीन काळात, शाळेत कुस्ती, स्वयंपाक, गायन, वादन, जादू इत्यादी साध्या सह-अभ्यासक्रम उपक्रमांचे आयोजन केले जात असे. जगाच्या इतर भागात, विविध प्राचीन संस्कृतींमध्ये सह-अभ्यासक्रम कार्यक्रम सामान्य होते.स्पार्टन संस्कृती (ग्रीस) मध्ये युद्ध, वीरतापूर्ण क्रियाकलाप, धनुर्विद्या, सर्जनशीलता आणि कलात्मक प्रतिभा व्यापक होत्या. रोमन संस्कृतीमध्ये, ठोस कला आणि हस्तकला आणि धार्मिक समारंभांना महत्त्व दिले जात असे. युरोपच्या काळोख्या इतिहासात, अभ्यासक्रमेतर क्रियाकलाप देखील जीवनाचा अविभाज्य भाग होते. धारणा काळात, अशा कियाकलापांना संरक्षण मिळाले

शिक्षण व्यवस्थेचा विचार करताना भारतीय शिक्षण संकल्पनेत शिक्षणाला अनन्य साधारण महत्व देण्यात आलेले आहे. तर "आचार्य देवो भव" या उक्तीन्वये शिक्षकांना देवापेक्षाही मोठे स्थान निर्माण करून देण्यात आलेले आहे. महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांणी 'शिक्षण हे वाघीनेचे दूध आहे आणि ते प्रशणारा गुरगुरल्याशिवाय राहणार नाही अशी शिक्षणाची महती वर्नविलेली आहे.

शिक्षणासंबधीची थोर विचारवंतांची मते विचारात घेताना शिक्षण व शिक्षण प्रक्रियेची खोली व व्यापकता आपल्या ध्यानात येते.ऋग्वेदानुसार मानवाला जे स्वावलंबी व निस्वार्थी बनवते ते म्हणजे शिक्षण होय. तर शंकराचार्य आत्मज्ञान आत्मसाक्षात्कारात शिक्षण असल्याचे सांगतात.

स्वतंत्र भारताचे पहिले उपराष्ट्रपती, शिक्षणतज्ञ व हाडाचे शिक्षक म्हणून ख्याती असलेले डॉ. राधाकृष्णन सांगतात

लोकशाहीनिष्ठ शिक्षण म्हणजे लोकांना केवळ साक्षर करणे नव्हे किंवा त्यांना एखाद्या व्यवसायात तरबेज करणे नव्हे, तर त्यापेक्षा काही अधिक आहे, ते म्हणजे मनाचे औदार्य. मानव प्राण्याविषयी आदर व एकसंघ राहण्याचे कौशल्य होय, यातूनच मानवी हृदयाला सौंदर्य प्राप्त होते.

उच्च प्रतीचे शिक्षण म्हणजे जे केवळ माहितीच देने नाही, तर सर्व चराचर सृष्टीशी आपल्या जीवनाचा मेळ घालून देते. अशी शिक्षणाची मर्मभेदी व्याख्या रवींद्रनाथ टागोर करताना दिसून येतील.

वरील सर्व शिक्षणाच्या व्याख्यांचा अभ्यास करताना असे ध्यानात घ्यावे लागेल कि, शिक्षण म्हणजे केवळ चार भिंतीच्या आत राहून, ठरलेल्या वेळात, दिलेले पुस्तक शिकवणे नव्हे तर बदलत्या जगात स्वावलंबी बनवत आत्मसाक्षात्कार निर्माण करणे, समाजात माणूस म्हणून राहण्यासाठी तयार करणे. तसेच केवळ माहितीवर चालणारा किंव्हा पोपटपंची करणारा शिष्य बनवणे नव्हे तर सजीव सृष्टीशी मिळतेजुळते करून देण्याची क्षमता निर्माण करणे असा अर्थ अभिप्रेत आहे. स्वामी विवेकानंद म्हणतात केवळ डोक्यात माहिती भरने म्हणजे शिक्षण नाही तर मानवामध्ये दैवी विचारांचे प्रकटीकरण करणे होय. माणसाला मानव बनविणे व त्यात दैवी गुण भरणे असे उपयोजन शिक्षणात असावे.

भारतीय शिक्षण व्यवस्थेचा इतिहास जर पहिला तर आपणास दिसेल की गुरूच्या आश्रमात जावून शिष्याला शिक्षण घ्यावे लागत असे. गुरु जी कामे सोपवतील ती सर्व शिष्याला पूर्ण करावी लागत असत. एखादा राजपुत्र असला तरी त्याला कोणत्याही प्रकारचे वेगळेपण नव्हते. त्यालाही युद्धकालांबरोबर इतर सर्व प्रकारची कार्ये किंवा कला अवगत करून घेणे अभिप्रेत होते. संगीतकला, नृत्यकला, गायन कला, व्यापार ज्ञान, कृषी ज्ञान वेदाभ्यास, याप्रकारच्या सर्व क्षेत्रांचा अभ्यास करावा लागत असे. एवढेच काय त्याला भिक्षाहीमागावी लागत असे. जेणेकरून एक सर्वजाण व सर्वगुणसंपन्न असा जाणता राजा प्रजेसाठी उपलब्ध करून देणे शक्य होईल. म्हणजेच पुरातनकालीन शिक्षण व्यवस्था हि शिष्याच्या सर्वांगीण विकासावर आधारलेली होती.त्यामुळेच केवळ पुस्तकी ज्ञान देणे म्हणजे शिक्षण होत नाही तर महात्मा गांधीजींच्या विचाराप्रमाणे शिक्षण म्हणजे बालकाच्या शरीर, मन, व आत्मा यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे होय. याचाच अर्थ विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधने म्हणजे शिक्षण होय. आणि हा सर्वांगीण विकास केवळ पाठ्यपुस्तकात पूर्ण होण्यास काही मर्यादा प्राप्त होतात. या मर्यादा सह शालेय उपक्रमातून पूर्ण करणे शक्य होऊ शकते. म्हणून सद्य पाठ्य पुस्तकात व पाठ्यांशात सहशालेय उपक्रमांचे महत्व अतुलनीय आहे.

सहशालेय उपक्रमांचे स्वरूप / व्याप्ती :

सद्य शिक्षण व्यवस्था ही बालककेंद्रित आहे. व या शिक्षण व्यवस्थेचे शाळा शिक्षक, समाज पालक हे महत्वपूर्ण पैलू आहेत. त्यामुळे सहशालेय उपक्रम योजिताना खालील घटकांचा विचार करणे रास्त ठरेल.

1. विद्यार्थी
2. शालेय व्यस्थापन शिक्षक व शाळा
3. पालक
4. समाज

1. **विद्यार्थी** :-

विद्यार्थी हा शिक्षण व्यवस्थेचा केंद्रबिंदू आहेसर्व .त्याचा सर्वांगीण विकास व्हावा हा मुख्य उद्देश ध्यानात ठेवून ,

शालेय वसहशालेय उपक्रम आयोजित करणे महत्वपूर्ण ठरते. हे करताना सहशालेय उपक्रमांनमध्ये सर्व विध्यार्थ्यांचा सहभाग असणे क्रमप्राप्त ठरते. त्यामुळे सहशालेय उपक्रमांचे शालेय स्तरावर बांधणी करताना विद्यार्थी विकास हेच उद्दिष्ट ध्यानात ठेवायला हवे.

2. शिक्षकः-

शालेय शिक्षण विभागाचा दुसरा महत्वाचा दुवा म्हणजे शिक्षक होय. शिक्षक जर परिपूर्ण असेल तर तो विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधू शकतो. कोणताही माणूस पूर्ण पणे परिपूर्ण असू शकत नाही. जर एखादा माणूस वा शिक्षक स्वतःला परिपूर्ण समजत असेल तर तो कल्पनेच्या विश्वात रममाण आहे असे समजावे. शिक्षकांनी स्वतःला एकदा विश्वकोश व सर्वगुण संपन्न न समजता विद्यार्थी समजने आत्यावशक आहे. शिक्षकांचा स्वयं विकास साधण्याची संधी सहशालेय उपक्रमांतून शक्य होऊ शकते. यातून शिक्षकांना स्वतःचा विकास व पर्यायाने विद्यार्थ्यांचा विकास साधने शक्य होऊ शकते. त्यामुळे काही सहशालेय उपक्रम शिक्षकांसाठी राबविणे गरजेचे आहे.

3. पालक

शाळा ही केवळ पालकांच्या विश्वासावर चालत असते, त्यामुळे पालकांचा विश्वास जिंकणे, त्यांमध्ये आपुलाकीची व सहकार्याची भावना जागृत करणे, व पाल्य कल्याण जोपासण्यासाठी काही सहशालेय उपक्रम पालकांना ध्यानात धरून आखण्याची गरज असते, जेणेकरून शिक्षण व्यवस्थेमध्ये पालकांचा सहभाग वाढावा व शैक्षणिक उद्दिष्ठ जोपासावे.

4. समाजः

मानव हा समाजशील प्राणी आहे. बालकाच्या शिक्षणाची खरी सुरुवात माता-पिता व कुटुंबानंतर समाजातच होत असते. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांला समाजातच कार्यरत व वावरावे लागते, त्यामुळे त्याच्या सामाजिक पैलूंचा विकास होणे, सामाजिक स्थितीची जाण असणे गरजेचे असते. त्यामुळे शाळेतील सहशालेय उपक्रम -फरताना किंवा मांडणीविकास इ. उद्दिष्टे पूर्णत्वाला नेणे शक्य होईल. त्यामुळे सहशालेय उपक्रमांची बांधणी उपक्रमशिलतेतूण व गरजेनुसार करणे योग्य ठरते.

**सहशालेय उपक्रमाचे फायदे --:**

1. सहशालेय उपक्रम (सीसीए) पद्धतशीर आणि अर्थपूर्ण शिक्षणाच्या संधींसाठी एक क्षितिज तयार करतात आणि विद्यार्थ्यांना भविष्यासाठी तयार करतात.
2. सीसीए तुम्हाला सक्रिय आणि उत्साही बनवते ज्यामुळे विद्यार्थ्यांना शिकण्यास मदत होते आणि त्यांना अनेक कौशल्ये विकसित करण्यास सक्षम करते.
3. सहशालेय उपक्रम व्यक्तिमत्त्वाच्या समग्र विकासात मदत करतात.
4. औपचारिक शिक्षणासह सहशालेय उपक्रम विद्यार्थ्यांच्या लपलेल्या क्षमतेला दिशा देण्यास आणि तुम्हाला एक चांगला नागरिक बनविण्यास मदत करतात.
5. सहशालेय उपक्रमांमध्ये सहभागी झाल्यानंतर सामाजिक, शैक्षणिक, बौद्धिक, सांस्कृतिक, लोकशाही, नागरी आणि सौंदर्यशास्त्र यासारखे क्षेत्र समृद्ध होतात.

6. खेळात चांगले असलेले विद्यार्थी देखील चांगले शैक्षणिक रेकॉर्ड करतात.
7. सहशालेय उपक्रम शिक्षणाचे महत्त्व समजून घेण्यास आणि निरोगी स्पर्धेची भावना विकसित करण्यास मदत करतात.

**संदर्भग्रंथ सूची**


1. बापट, भा. गो. (१९७५). शैक्षणिक संशोधन. पुणे: नूतन प्रकाशन
2. भिंताडे वि. रा. (1994) शैक्षणिक संशोधन पद्धती. पुणे: नूतन प्रकाशन
3. मुळे रा. श. आणि उमाठे, वि. तू. (1977 )शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे .नागपूर: महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ
4. https://eric.ed.gov
5. https://en.wikipedia.com